# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 08/11/2019 (शुक्रवार)
# (सायंकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

दिनांक 07/11/2019 रोजी ठाणेदार पो. स्टे. केळवद सपोनि श्री. सुरेश मट्टामी यांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे रोडनी एमपी–28/एच–1786 क्रमोकाचा ट्रक मध्ये अवैध्यरीत्या कतलीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशा खबरे वरुन पोउपनि श्री. अर्जुन राठोड हे पो. स्टे. केळवद स्टाफ सह पांढुर्णा रोड हायवे क्र. 47 वरील सावळी फाट्यावर दिनांक 07/11/2019 चे पहाटे 04:30 वा. नाकाबंदी लावून वाहन तपासात असतांना एक पांढऱ्या रंगाचा 12 चक्का ट्रक क्र. एमपी–28/एच–1786 वाहन भरधाव वेगाने येतांना दिसला. चालकाला थांबविण्याचा ईशारा दिला असता त्याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन नागपूरच्या दिशेने पळवुन नेले. पोलिसांना त्या वाहनाबाबत संशय आल्याने वाहनाचा पाठलाग करीत असतांना चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक उमरी गावा लगदच्या उड्डान पुलाजवळ ट्रक सोडून अंधाराचा व जंगलाचा फायदा घेवून पळ काढला. पोलिस स्टाफच्या मदतीने पाहणी केली असता सदर वाहनच्या डाल्यामध्ये 37 गाई गौवंश जनावरे अत्यंत क्रुर व निर्दयतेने पाय व तोंड दोरीने बांधुन दिसले. सदरचे जनावरे ही कत्तलीसाठी वाहनात भरुन घेवुन जात होते.एकुण 24 नग गाई व 13 गौरे गौवंश किमती 3,70,000/– रु., एक एमपी– 28/एच–1786 क्रमांकाचा ट्रक किमती 18,00,000/–रुपये असा एकुण कि. 21,70,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन केळवद अप क्र. 252/2019 कलम 11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. 1960 सह कलम 5 (अ), 9 महा. सरंक्षण अधिनीयम 1965 सहकलम 179/177,184 मो वा का 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि श्री अर्जुन राठोड हे करीत अहेत.

सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सपोनि श्री सुरेश मट्टामी, पोउपनि श्री अर्जुन राठोड, नापोशी राजेन्द्र रेवतकर, नापोशी रविंद्र चटप, पोशि सचिन येडकर, चानापोशि गुण्वत्ता डाखोळे, होमगार्ड होमराज घंगारे, सुनिल झाडे, अतुल कोल्हे यांनी केली आहे.




अपघातात मृत्यु

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा एनएच रोड मानेगाव टेक येथे दिनांक 06/11/2019 चे 23:45 वा. दरम्यान सीजी– 04/एलजी– 7578 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणाऱ्या एमपी– 20/डी– 5200 क्रमांकाच्या तवेरा गाडीला धडक दिली. या अपघातात तवेरा गाडीमधील 1) रमेश सुभाषचंद्र विश्वकर्मा, वय 60 वर्ष, 2) अन्नुबाई रमेश विश्वकर्मा, वय 55 वर्ष, दोन्ही रा. जब्बलपूर याचा मृत्यू झाला. तर टवेरा गाडीचा चालक 1) सुकलसिंग रंजनसिंग कुलसे, वय 40 वर्ष, 2) विमलाबाई सुरेश विश्वकर्मा, वय 50 वर्ष व 3) सुरेश सुभाषचंद्र विश्वकर्मा, वय 60 वर्ष तिन्ही रा. जब्बलपूर हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कलम 283 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रविण बोरकुटे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर